# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १०३ वा ❑ रविवार दि.०१ जून २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


# काव्ययोग काव्यसंस्था पुणे आयोजित काव्यस्पर्धेत प्रदीप बडदे राज्यातून प्रथम

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** – काव्ययोग काव्यसंस्था पुणे आयोजित, जागतिक महिला दिनानिमित्त काव्ययोगचे संस्थापक योगेश हरणे यांनी मराठी भाषेला प्राप्त झालेला अभिजात भाषेचा दर्जा आणि वाचन-लेखन संस्कृती जपण्याच्या उद्देशाने तसेच साहित्यिकांना नवे व्यासपीठ मिळवून देण्याच्या दृष्टीने काव्यलेखन स्पर्धा आयोजित केली होती. पुणे, मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पालघर, पनवेल, रायगड, सातारा, अहिल्यानगर, नाशिक, बीड, लातूर, चंद्रपूर अशाप्रकारे राज्यभरातून ४४६ स्पर्धकांचा उस्फूर्त प्रतिसाद या स्पर्धे साठी लाभला होता.

स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून पुण्यातील ज्येष्ठ साहित्यिक आणि व्यासंगी व्यक्तीमत्व मा.विजय सातपुते हे लाभले होते. त्यांची विविध पुस्तके प्रकाशीत असून सामाजिक आणि साहित्यिक क्षेत्रात त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत. त्यांच्या चौकस आणि उत्कृष्ट परीक्षणातून नवी मुंबईचे उत्कृष्ट कवी/ लेखक/ पत्रकार प्रदीप बडदे यांना महाराष्ट्र राज्यातून प्रथम क्रमांक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

स्पर्धेत सर्व स्पर्धकांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करून आपापल्या परीने उत्तम रचनांचे लिखाण केले होते. परीक्षणातून ३० विजेते व उपविजेते राज्यभरातून ठरविण्यात आले. त्यात पुण्याच्या सरोज बामणे - सर्वोत्कृष्ट, अनिता गुजर - उत्कृष्ट, प्रदीप बडदे - प्रथम, रवींद्र गाडगीळ - द्वितीय, रघुनाथ पाटील - तृतीय हे विजेते तर प्रतिमा काळे, रंजना अय्यर, सिता कुदळे, सरोज गाजरे, सुवर्णा पवार, बाबू डिसोजा, शैलजा करोडे, आशा नष्टे हे उपविजेते ठरले.

संस्थेचे सर्वेसर्वा योगेश हरणे व राजयोग संस्थेचे अध्यक्ष गौरव पुंडे यांच्या सुंदर नियोजनातून या स्पर्धे चा पारितोषिक वितरण व पुरस्कार वितरणाचा सोहळा २५ मे २०२५ रोजी भावे हायस्कूल परीसर, सदाशिव पेठ, पुणे येथे पार पडला. या कार्यक्रमाला वसुधा नाईक, प्रा.शरदचंद्र काकडे, डॉ. शैलेंद्र भणगे, चैताली कापसे, विलास बाबर, श्रीराम घडे व प्रमोद सुर्यवंशी हे मान्यवर पाहुणे उपस्थित होते. त्यांच्याहस्ते विजेत्यांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीशैल्य सुतार यांनी मोठ्या खुबीने खेळीमेळीच्या वातावरणात केले.



## विशेष लेख...

# राष्ट्रवादाच्या नवीन राजकारणामुळे विरोधकांचा ताण वाढला!

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ''हम घर मे घुस कर मारेंगे'' सारख्या विधानांसह ऑपरेशन सिंदूरवर कठोर भूमिका घेतली आहे, ज्यामुळे राष्ट्रवादाचे राजकारण तापले आहे. विरोधी पक्ष या ऑपरेशनला ''अपयश ऑपरेशन'' म्हणत आहेत आणि त्याच्या यशावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत, तर गुजरातसारख्या राज्यात लोक रोड शो दरम्यान पंतप्रधानांना पाठिंबा देताना ''तुम रक्षक कहू को डरना'' सारखे श्लोक उद्धृत करण्यात आले. या राजकीय वातावरणाचा परिणाम पुढील दोन वर्षांत तेरा राज्यांमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकांवर होण्याची शक्यता आहे, ज्यासाठी पंतप्रधान मोठ्या प्रमाणात दौरे देखील करत आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑपरेशन सिंदूरबाबत दिलेले प्रत्येक आव्हान आता विरोधकांच्या राजकारणाला अस्थिर करत आहे असे विरोधकांना वाटू लागले आहे . सहा वर्षांपूर्वी बालाकोट हल्ल्यानंतर झालेल्या हल्ल्यापेक्षा राष्ट्रवादाच्या राजकारणात ऑपरेशन सिंदूरचा नरेंद्र मोदींना जास्त फायदा होईल असे विरोधकांना वाटते . जेव्हा संपूर्ण जग ऑपरेशन सिंदूरच्या सामर्थ्याची कबुली देत आहे, तेव्हा विरोधक अचानक त्याला एक छोटे युद्ध, एक अयशस्वी ऑपरेशन आणि ''त्यांनी काय साध्य केले?'' अशा प्रश्नांनी का घेरत आहेत. ऑपरेशन सिंदूरनंतर मोदींना बालाकोटनंतर मिळालेल्या ताकदीसारखीच ताकद मिळणार आहे असे विरोधकांना वाटते .

शिवसेना (यूबीटी) नेते संजय राऊत यांनी ऑपरेशन सिंदूर हे एक अपयशी ऑपरेशन असल्याचे म्हटले आहे. परंतु देशाच्या हितासाठी, आम्ही विरोधी पक्षात आहोत, त्याबद्दल जास्त बोलू इच्छित नाही.

काँग्रेस प्रवक्ते पवन खेरा म्हणाले की, सिंदूर नष्ट करणाऱ्या दहशतवाद्यांना तुम्ही आणले आहे का? युद्धबंदीमध्ये त्या दहशतवाद्यांना आणण्याची अट आहे का? पंतप्रधान तिथे गेलेच नाहीत, ते बाजूला ठेवा.

पाकिस्तानच्या दहशतवादाविरुद्ध ऑपरेशन सिंदूरच्या २० दिवसांत पंतप्रधानांनी आतापर्यंत सहा सार्वजनिक भाषणे केली आहेत. त्यात काही संदेश लपलेला आहे.

पंतप्रधान मोदी काय बोलत आहेत आणि रोड शोमध्ये काय दिसतंय ते पाहून चित्र स्पष्ट होतं. जिथे लोक भारतीय जनता पक्षाच्या झेंड्याऐवजी राष्ट्रध्वज, तिरंगा घेऊन सर्वत्र पोहोचतात. जिथे पंतप्रधानांचे स्वागत केले जाते. जिथे लष्कराला पूर्ण ताकदीने काम करण्याची स्वातंत्र्य दिल्याबद्दल पंतप्रधानांचे आभार मानले जातात.

पहलगाम हल्ल्यानंतर वाढणारा जनसमर्थन लोकसभा निवडणुकीच्या एका वर्षाच्या आत विरोधकांच्या राजकारणासाठी हानिकारक आहे असे विरोधकांना वाटते आणि म्हणूनच विरोधी पक्षातील नेत्यांनी ऑपरेशन सिंदूरला अपयश म्हणायला सुरुवात केली आहे.

**ऑपरेशन सिंदूरचा परिणाम पुन्हा होईल का?**

पुलवामा हल्ल्यानंतर भारताच्या बालाकोट हल्ल्यामुळे मोदींना २०१९ च्या लोकसभा निवडणुका जिंकण्यास मदत झाली असे राजकीय विश्लेषकांचे म्हणणे आहे. निवडणूकपूर्व सर्वेक्षणात, अनेक एजन्सी भारतीय जनता पक्ष बहुमतापासून दूर असल्याचा दावा करत असताना, बालाकोट हल्ल्यानंतर राष्ट्रवादाच्या लाटेने भाजपला ऐतिहासिक विजय मिळवून दिला. यावेळी ऑपरेशन सिंदूरचा फायदा मोदींना पुन्हा मिळेल अशी भीती विरोधकांना आहे.

# ''चिमुरडी रेवा चे प्रथम सामाजिक कार्य'' बारशा निमित्त जमा रक्कम १५००० रु अपंग शाळेस मदत !




**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर / विलास कोरडे** – कुलकर्णी व कोरडे परिवार तर्फे नुकताच त्यांच्या नातीचा बारशाचा कार्यक्रम संपन्न झाला. येणाऱ्या प्रत्येक पाहुणे मित्र मंडळी ना फुलाचे हार, बुके व गिफ्ट न आणण्यास विनंती करण्यात आली होती, त्या ऐवजी दान पेटी ठेवण्यात येऊन ज्यात ऐच्छिक रक्कम टाकणे विषयी विनंती करण्यात आली. या मधे उपस्थिताकडून १५००० रक्कम जमा झाली. रेवाची आई-वडील पल्लवी व मंदार कुलकर्णी यांचे संकल्पना नुसार ही रक्कम अपंग शाळेस देण्याचे ठरवण्यात आले.

त्यानुसार कुलस्वामिनी कार्यालय येथे चैतन्य कानिफनाथ निवासी अपंग विद्यालय, नारेगाव या शाळेचे विद्यार्थी अर्जुन शिंदे, निलेश सपकाळ, नैतिक मोरे, अबू बखार बागवान तसेच संस्थेचे अध्यक्ष सखाराम पोळ शाळेचे मुख्याध्यापक अनंत पाटील सर, व मंगेश गायकवाड सर यांच्याकडे १५००० रक्कम रेवाच्या हस्ते आज देण्यात आले.रेवा चिमुरडी ही चार महिन्याची असून तिच्या बारशानिमित्त हा स्तुत्य, नावीन्यपूर्ण सामाजिक उपक्रम कुलस्वामिनी मंगल कार्यालय येथे घेण्यात आला .

यावेळी कुलस्वामिनी प्रतिष्ठानचे सौ अलका व विलास कोरडे, सौ माया व किरण कुलकर्णी, संजय राठोड, अविराज कोरडे, चंद्रमुनी जायभाय, अनिल गावंडे, प्रल्हाद गायकवाड, नावकर राहुल व सिडको परिसरातील महीला व नागरिक उपस्थित होते.

नव्या पिढीत बालपणापासून सामाजिक बांधिलकी रुजवण्यात यावी व त्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन विलास कोरडे यांनी बोलुन दाखवले. कोणत्याही आनंद सोहळ्यात सामाजिक लोकोपयोगी उपक्रम हाती घ्यावे असे सखाराम पोळ यांनी सांगितले. कार्यक्रम संचलन संजय राठोड यांनी केले तर आभार मंदार कुलकर्णी यांनी मानले.

# राजमाता अहिल्याबाई होळकर जयंती व जागतिक तंबाखू विरोधी दिवस उत्साहात साजरा




**ज्योतिर्मय साहित्य**

**कुंबेफळ** – येथील गंगा महाविद्यालयात आज (शुक्रवार) थोर समाजसुधारक आणि आदर्श प्रशासक राजमाता अहिल्याबाई होळकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. याच दिवशी 'जागतिक तंबाखू विरोधी दिवस' देखील साजरा करत, महाविद्यालयाने दुहेरी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. जयंतीनिमित्त महाविद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी अहिल्याबाईच्या जीवनचरित्रावर आधारित निबंध स्पर्धेत उत्स्फूर्तपणे भाग घेतला, ज्यातून त्यांच्या कार्याविषयीचे सखोल ज्ञान दिसून आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. बालकांडे सर होते. याप्रसंगी प्रा. कुशल पाटील, श्री. विश्वजीत पाटील, वायकोळे मॅडम, वाणी मॅडम, वाघ मॅडम, स्पोर्ट्स चव्हाण सर, साळवे सर, निकम सर, चव्हाण सर, तांबे सर, काकडे सर, गवळी सर यांसह इतर प्राध्यापक आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याचवेळी 'जागतिक तंबाखू विरोधी दिवस' साजरा करत, तंबाखूच्या दुष्परिणामांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. तंबाखूमुळे आरोग्यावर होणारे गंभीर परिणाम आणि कॅन्सरचा वाढता धोका यावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली. ''तंबाखू सोडा, जीव वाचवा'', ''कॅन्सरचा धोका टाळा'' अशा विविध घोषणा देत प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एका घरी जाऊन तंबाखूच्या दुष्परिणामांविषयी माहिती दिली. या उपक्रमामुळे समाजात तंबाखूविरोधी जागरूकता वाढण्यास मदत झाली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वायकोळे मॅडम यांनी केले. संस्थेचे सचिव श्री. राजेंद्र खंडेलवाल यांची प्रमुख उपस्थिती या कार्यक्रमाला लाभली. श्री. विश्वजीत पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# डॉ. धारूरकर यांना जागतिक अर्थशास्त्र परिषदेचे निमंत्रण

**ज्योतिर्मय साहित्य**




**छत्रपती संभाजीनगर**– पोलंडची राजधानी वार्सा शहरात होत असलेल्या आठव्या आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र परिषदेस ज्येष्ठ विचारवंत आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील निवृत्त प्राध्यापक व विभागप्रमुख डॉ. वि. ल. धारूरकर यांना जागतिक अर्थशास्त्र परिषदेचे विशेष निमंत्रण आले आहे. डॉ. धारूरकर ३ जून २०२५ रोजी होणाऱ्या ऑनलाइन जागतिक परिषदेत भारतातील आर्थिक क्रांती : कृषी आणि ग्रामीण विकास, जागतिक हवामान बदलाच्या संदर्भात अभ्यास या विषयावर ऑनलाइन संबोधन करणार आहेत. डॉ. धारूरकर सध्या पुणे येथील भारतीय ज्ञान संस्थेत संशोधन व विकास संचालक म्हणून कार्यरत आहेत. त्यांचे संशोधक विद्यार्थी शंतनू वाटाणे हे या शोधनिबंधाचे सहलेखक असून, उभयतांचा शोधनिबंध वार्सा विद्यापीठाच्या ॲनल्स ऑफ ॲग्रीकल्चर ॲंड रुरल डेव्हलपमेंट या संशोधन पत्रिकेत प्रकाशित होणार आहे. या शोधनिबंधात त्यांनी भारत जगामध्ये पहिल्या क्रमांकाची कृषी सत्ता कशा प्रकारे बनला आहे आणि भारतातील जनसंवाद व प्रसारमाध्यमांनी या कृषी क्रांतीस कसा हातभार लावला आहे, ते स्पष्ट केले आहे. या यशाबद्दल उभयतांचे अभिनंदन होत आहे.

# ज्ञानेश्वर ब्राह्मण संस्थेतर्फे सावरकर जयंती साजरी

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** – भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीत महत्वपूर्ण योगदान देणारे स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर यांचे जीवन आदर्शवत असून देशासाठी त्यांनी केलेले कार्य अजोड आहे असे प्रतिपादन मयूर सरनाईक यांनी केले. पिंपळे सौदागर येथील श्री संत ज्ञानेश्वर ब्राह्मण सभेच्यावतीने आयोजित स्वातंत्रवीर वि.दा. सावरकर जयंती समारंभात ते बोलत होते. कुणाल आयकॉन रोडवरील राजवीर सोसायटीमध्ये विलास जोशी यांच्या अध्यक्षतेखाली नुकताच हा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेचे ज्येष्ठ सदस्य सुरेश तारे चारुहास शुक्ल आणि सामाजिक कार्यकर्ते संकेत काटे यांचे हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. या प्रसंगी महिलांनी जयोस्तुते... हे गीत सामुदायिक रीत्या सादर केले. या कार्यक्रमाला जोडून बाणेर येथील सुप्रसिद्ध अर्थोपेडिक डॉ. सचिन खलाने यांनी ज्येष्ठ नागरिका साठी सांधेदुखी, गुडघे दुखी वरील आधुनिक उपचार या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन रमेश भट आणि स्नेहा चिंचवडकर यांनी केले. अनिल कुळकर्णी यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी करण्यासाठी संतोष वर्तक, वासंती जोशी, अनुराधा निलेगावकर, शशांक मूलमुले यांनी परिश्रम घेतले.





– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com

## आनंदी पहाट...


### प्रत्येक बाबीकडे मानसशास्त्रीयदृष्ट्या बघावे

ज्योतिर्मय साहित्य

मनाला रमवण्यासाठी आणि नवं आजमावण्यासाठी आपल्या अंतर्मनाचा मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यासपूर्वक विचार करावा लागतो. आपल्या मनाला नीट समजून घ्यावं लागतं. आपल्याच मनाचा अनेकदा आपल्याला अंदाज येत नाही. आपलं मन वर वर कितीही शांत वाटत असलं तरीही, काही वादळं आतल्याआत चालूच असतात, काहीवेळा अंतर्मनाला उध्वस्त करत असतात. विचारांचं थैमान सदोदित चालूच असतं, परंतू त्या विचारांना किनारा सापडत नसतो, वाट सापडत नसते. त्यामुळे काहीवेळा आपलीच वाट लागते. हे आपल्याला अनेकदा कळत असतं पण वळत नसतं, हीच तर उणिव असते. मनांत येणारी प्रत्येक बाब नवीन एक प्रश्न घेऊन येत असते. त्या प्रश्नामुळे आपलं मस्तक गरम होत असतं; पण काहीवेळा शोधूनही उत्तर सापडत नाही.

कधी कधी उत्तर सोप्प असूनही आणि माहिती असूनही वेळेला सुचत नाही, कारण ते आठवत नाही. कालांतरानं परिस्थिती अशी येते कि, आपण जिंकलोय कि हरलोय तेच कळत नाही. आपल्या अंतर्मनाला पडलेल्या प्रश्नाचं उत्तर सापडलं, असं ठरवणंच कठीण होतं. निर्माण झालेल्या संभ्रमामुळे थोडं जे काही मिळालंय हे सगळ्यांना दिसत असतं, त्यामुळे हरलोय हे मान्य करायला जग तयार नसतं आणि जे मिळालंय ते असं काही मिळालेलं असतं कि, आपण जिंकलोय हे मान्य करायला आपलं मन तयार नसतं. पर्यायानं दुधाची तहान ताकावर भागवावी लागते, तीही घरातल्या बाकावर बसून; कारण मनाला आश्वस्त करेल अशी ती एकमेव हक्काची आणि सुरक्षित जागा असते.

## निसर्गायन – सफर पाटणादेवीची





ज्योतिर्मय साहित्य

माझं गाव जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव. तुम्ही चाळीसगावला आलात की जवळच साधारण १८ किमी वर गौताळा अभयारण्य आहे. हे अभयारण्य, पाटणादेवी इ रम्य स्थळांचं दर्शन घेण्यासाठी आपण चाळीसगावहून बसने किंवा आपल्या खाजगी वाहनाने पण तिथे जाऊ शकतो. खरं तर अर्ध्या पाऊण तासाचा रस्ता आहे. पण मधून मधून खराब रस्त्यांमुळे आपल्याला थोडा अधिक वेळ लागू शकतो. अर्थात आपण रमतगमत आणि निसर्गाची शोभा पाहत जाऊ या. आपल्याला घाई नाही. गौताळा अरण्यातील एक भाग म्हणजे पाटणादेवीचं मंदिर. अर्थात चंडिकादेवी असंही म्हटलं जातं. तिथे आपण जाणार आहोत आणि तिथून आपल्याला साधारण एक ते दीड किमी चा ट्रेक करायचाय. निसर्गभ्रमंती. आहात ना तयार ? तसं आज मी तुम्हाला फक्त धवलतीर्थ धबधब्यावर घेऊन जाणार आहे. पितळखोरा लेणी, उभा गणपती, गौरी कुंड इ ठिकाणे बघायला तुम्हाला दोनतीन दिवस वेळ काढून यायला लागेल. चला तर मग. आपल्याला जास्त सामान सोबत घेण्याची आवश्यकता नाही. आपण असं करू आपल्या घरून तयार केलेल्या मस्त दशम्या, पोळ्या, सोबत लोणचं, थोडंसं दही तुम्हाला आवडत असेल तर घेऊया. जोडीला चटणी, कांदा इ गोष्टी आहेतच. आणि हो, पुरेसं पाणी पण असू द्या जवळ. वा, छान..! तयार झालात लगेच. बसा गाडीत.



आता निघालोय आपण. चाळीसगावच्या बाहेर आलो. आता समोर हा बायपास किंवा हायवे दिसतो ना, तो क्रॉस करायचाय आपल्याला. तो क्रॉस केला की लागलो आपण पाटणादेवी रस्त्याला. नुकताच पाऊस पडून गेलेला आहे. त्यामुळे हवेत छान गारवा जाणवतोय. रस्त्याच्या दोन्ही बाजूला शेतं आहेत. शेतकऱ्यांनी मशागत करून तयार ठेवलेली दिसताहेत. अजून पुरेसा पाऊस झालेला नाही. पण लवकरच ते योग्य वातावरण पेरणीसाठी तयार झालं की पेरणी करतील, आणि आणखी एकदोन महिन्यांनी जेव्हा पुन्हा आपण इकडून जाऊ, तेव्हा ही शेतं हिरवीगार पाचूची बेटं भासतील आपल्याला. आपण चाळीसगावापासून चारपाच किमी वर आलो आहोत आता. तुमच्या डाव्या बाजूला खिडकीतून बाहेर बघा. एक कमान दिसतेय का ? त्यातुन मध्ये गेलं की वालझिरी म्हणून एक छोटंसं तीर्थक्षेत्र बघायला मिळेल आपल्याला. त्या ठिकाणी वाल्मिक ऋषी, भगवान शंकर, विठ्ठल रुख्माई , राम सीता, मारुती, आणि नवनाथांची मंदिरं आहेत. या ठिकाणी महाशिवरात्रीला यात्रा असते आणि भाविक लोक मोठ्या संख्येने महादेवाचे दर्शन घेण्यासाठी येतात. पण आज आपल्याला तिकडे जायचं नाहीये. वेळ कमी पडेल. म्हणून मी दुरूनच दाखवतो आहे. **(क्रमशः)**



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

### नवविधा भक्ति

ज्योतिर्मय साहित्य

वात, पित्त, कफ कोणत्या दोषाने कोणता रोग होतो हे अभ्यासून आपले आचरण ठेवावे. नरकातील कुंभिपाक, तेथील नाना यातना, यमलोक, स्वर्गातील. सुख,नरकातील दुःख याविषयी अभ्यास करावा. वसकल जनांना वाईट गोष्टींपासून परावृत्त करावे.

नवविधा भक्तिचे प्रकार अभ्यासून समाजातील प्रत्येक ठिकाणी ज्ञान जनजागृती करावी. सायुज्यमुक्ति कशी प्राप्त होते हे समजण्यासाठी त्यासंबंधी विवेचन करणारी मतं अभ्यासावी. आपले वेद, शास्त्र, पुराणे चार देहांचे निरसन ऐकून त्यावर विचार विनिमय करावा.


ऋग्वेद--प्रज्ञानं ब्रम्ह
यजुर्वेद--अहं ब्रम्हास्मि
सामवेद---तत्वमसि
अथर्ववेद---अयमात्मा ब्रम्ह

चार वेदांची ही चार महावाक्ये आहेत. तर स्थूल, सुक्ष्म, कारण, महाकारण हे पिंडाचे चार देह आहेत.

मित्रांनो, समर्थ म्हणतात वळ सांगितलेल्या सर्व गोष्टी लक्षात ठेवाव्यात त्यातील तत्त्वज्ञान किंवा रहस्ये शोधून ग्रहण करावीत पण जे असार आहे जे मिथ्या आहे, कालानुरूप जे निरूपयोगी आहे ते सोडून द्यावे. तात्पर्य असे की सगुणाच्या चरित्राचे श्रवण करावे, निर्गुण रूपाचे ज्ञान करून घ्यावेव भगवंताशी वेगळेपणा टाकून त्याच्याशी तदाकारतेचे रहस्य शोधावे, भगवंताशी एकरूप व्हावे. ''अवघा रंग एक झाला ''

श्री राम जय राम जय जय राम
जय जय रघुवीर समर्थ **(क्रमशः)**

## नामसाधन कसे करावे ?



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

नामाचे साधन कसे करावे ? एखाद्या दगडावर पुष्कळ पाणी एकदम ओतले तर तो दगड भिजेल आणि पाणी निघून जाऊन कोरडा होईल. पण तेच पाणी थेंब थेंब असे एकाच ठिकाणी आणि अखंड पडत राहिले तर त्या दगडाला भोक पडेल, आणि काही दिवसांनी दगड फुटूनही जाईल; त्याप्रमाणे, केव्हातरी पुष्कळ साधन करण्यापेक्षा अगदी अल्प प्रमाणात का होईना पण नित्यनेमाने, ठराविक वेळी, आणि शक्य तर ठराविक स्थळी, जर नामाचे साधन केले तर ते जास्त परिणामकारक होते. जात्याला दोन पेठी असतात; त्यातले एक स्थिर राहून दुसरे फिरत राहिले तर दळण दळले जाऊन पीठ बाहेर पडते. पण जर दोन्ही पेठी फिरत राहिली तर दळण दळले न जाता फुकट श्रम मात्र होतात. माणसाचे शरीर आणि मन अशा दोन पेठी आहेत. त्यांतले मन हे स्थिर आहे आणि देह हे फिरणारे पेठे आहे. मन परमेश्वराच्या ठिकाणी स्थिर करावे, आणि देहाने प्रपंचाच्या गोष्टी कराव्यात. प्रारब्धाचा संबंध देहापर्यंतच असतो. प्रारब्धरूपी खुंटा देहरूपी पेठयात बसून तो त्याला फिरवतो, आणि मनरूपी पेठे स्थिर असते. देह प्रारब्धावर सोडावा, आणि मन भगवंताच्या स्मरणात स्थिर ठेवावे, याहून नामाचे साधन दुसरे काय ? हे साधन अमक्यालाच साधेल असे नाही, तर ते कोणालाही साधेल. गरिबाला गरिबीचे दुःख होते म्हणून साधत नाही, तर श्रीमंताला पैशाचा अभिमान आणि लोभ असतो म्हणून साधत नाही; विद्वानाला विद्येचा अभिमान होतो म्हणून साधत नाही, तर अडाण्याला काय करावे हे समजत नाही म्हणून साधत नाही. साशंक वृत्तीने कितीही साधन केले, कितीही नामस्मरण केले, तरी कधी समाधान होणार नाही.

नीतिधर्माचे आचरण, शास्त्रशुध्द वर्तन, शुद्ध अंतःकरण, आणि भगवंताचे स्मरण, इतक्या गोष्टी असतील तरच साधक शेवटपर्यंत पोहोचेल; आणि शेवटपर्यंत तो पोहोचला तरच फायदा. घरी पोहोचल्यावर पत्र लिहा असे म्हणतात, याचा अर्थ हाच आहे. प्रपंच करीत असताना वाईट विचार मनात येत ात, त्याचप्रमाणे परमार्थ करीत असतानाही वाईट विचार आले म्हणून घाबरण्याचे कारण नाही. ज्यावेळी वाईट विचार मनात येतील त्यावेळी भगवंताचे नाम घेतले तर त्या विचारांची मजल पुढे जाणार नाही. दृढ विश्वासाने नाम चालू ठेवावे. जिथे कर्तव्याची जागृती आणि भगवंताची स्मृति आहे तिथेच समाधानाची प्राप्ती होते. भगवंता, मी तुझा आहे असे रात्रंदिवस म्हणत गेल्याने भगवंत प्रकट होत जाईल; आणि भगवंत जितका प्रकट होत जाईल तितके मी पणाचे दडपण आपोआप कमी होत जाईल.

प्रारब्धाची व ग्रहांची गती देहापर्यंतच आहे. मनाने भगवंत भजायला त्यांची आडकाठी नाही.

## ॥ संत महात्म्य ॥

### महात्म्यांच्या आविष्कार

ज्योतिर्मय साहित्य

भागवत पुराणात ''जे जे भेटे भूत तेथे मानिजे भगवंत'' किंवा ''परवानगी आणि अर्पण'' हा प्रयोग दिला आहे. हे प्रयोग प्रत्येकाने गिरवायलाच हवेत, तरच भगवंताची प्राप्ती होईल.

पण आपली हे प्रयोग सतत करण्याची अजिबात तयारी नसते. आपल्याला असे वाटते की, संताच्या चरणावर डोके ठेवावे ,असे केले की लगेच काहीही न करता संत आपल्याला आशीर्वाद देतील, आणि  आपल्याला तात्काळ भगवत दर्शन होईल!

किंबहुना इतक्या सहजासहजी भगवत दर्शन झाले तरच ते आपल्याला हवे असते. असे कधीच होऊ शकत नाही.

भगवत दर्शन होण्यासाठी भगवंताची समीपता यावी म्हणून, आपल्याला आपल्या इंद्रियात वैराग्य,रक्तात विरक्ती आणि बुद्धीत विवेक निर्माण व्हावा लागेल. आपले विकार कमी करावे लागतील आणि प्रभू भक्तीचे बीज त्यात अंकुरित करावे लागेल.

संत मीराबाई म्हणते जन्मभरीच्या श्वासाइतके मोजियले हरिनाम, बाई मी विकत घेतला श्याम.

संतांनी आम्ही प्रपंच करीत असतानाही कांहीं प्रयोग करण्या साठी दीले आहेत जसे की...

''जे जे भेटे भूत तेते मानिजे भगवंत'' व  हा प्रयोग म्हणजे, जो कोणी भूत मात्र, पुरुष, स्त्री कोणीही दिसल्याबरोबर त्यास विनम्र भावाने नमस्कार करणे.

हाच प्रयोग संत श्रेष्ठ श्री तुलसीदास यांनी दिला आहे. ते म्हणाले ''सियाराम स्वरूप सब जग जानी करहू प्रणाम जोड जुग पाणी''

येथे पाणी म्हणजे हात हा अर्थ आहे म्हणजे कोणीही स्त्री दिसेल तर तिला सीतामाई समजावे पुरुष दिसेल तर त्यास प्रभुराम समजावे आणि त्या प्रत्येकास विनम्र भावाने, हात जोडून वंदन करावे.

हा प्रयोग तुलसीदासांनी आपणास दिला. याचा अर्थ त्यांनी तो गिरवला नाही असे अजिबात समजू नये. आधी करावे मग सांगावे या युक्तीप्रमाणे त्यांनी हा प्रयोग आयुष्यभर गिरवला. प्रेम वृद्धिंगत करण्याचा हा एक मोठा प्रयोग आहे. हे प्रयोग आपणास करावे लागतील .आयुष्यभर आपल्या विकारावर नियंत्रण ठेवत त्यास कमी कमी करावे लागेल, तर कुठे आपण प्रभुभक्ती, प्रभू कृपेस पात्र होऊ.

संतांचे चरित्र अभ्यासताना त्यांनी कोणते प्रयोग गिरवले व ते आपण घेऊ शकतो का हे पाहण्यासाठी चरित्राचे अवलोकन करावे.

श्रीकृष्ण सख्यापैकी एका सख्याचा कलियुगातील अवतार आता आपण पाहणार आहोत.

७) नंद दास :

अष्टछाप संतांमध्ये सातवे संत हे नंददास होत. नंददास हे विठ्ठल दासांचे शिष्य. त्यांचा कार्यकाळ पंधराशे बहात्तर ते सोळाशे चाळीस या दरम्यान झाला. ते शामपूर तालुका कासगंज येथील रहिवासी होते. भारद्वाज गोत्रीय धनाड्य ब्राह्मण परिवारात यांचा जन्म झाला. सच्चिदानंद शुक्ल यांचे ते नातू आणि जीवाराम हे त्यांच्या वडिलांचे नाव होते. आजोबा सच्चिदानंद यांना दोन पुत्र होते. एक जीवा राम आणि दुसरे आत्माराम.

आत्माराम यांचे पुत्र म्हणजेच श्री तुलसीदास यांनी श्री राम रचित मानस ची रचना केली.

या दृष्टीने नंददास यांचे श्री तुलसीदास हे चुलत भाऊ होते. एकाच कुटुंबात दोन महान संतांनी जन्म घेतला हे महत्त्वपूर्ण आहे.

नंद दासांच्या पत्नीचे नाव कमला आणि मुलाचे नाव कृष्णदास होते. नंददास स्वभावाने मनमोकळे आणि धीट होते. एकदा ते फिरत द्वारकेला गेले. तिथे एका क्षत्रिय महिलेवर त्यांचे प्रेम बसले. कोणाचीही पर्वा न करता ते त्या क्षत्रिय नारीस भेट देण्यास जात असत. त्यानंतर ते इसवीसन १६१६ मध्ये विठ्ठल दासांच्या संपर्कात आले आणि तेथून कृष्ण भक्तीचा त्यांचा प्रवास सुरू झाला. नंद दासाचा कृष्ण हा सर्वस्व आहे. सर्व एक गती आहे.

**(क्रमशः)**

## नीतिशतक निरूपण



अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

वह्निस्तस्य जलायते जलनिधिः कुल्यायते तत्क्षणान्
मेरूः स्वल्पशिलायते मृगपतिः सद्यः कुरङ्गायते।
व्यालो माल्यगुणायते विषरसः पीयूषवर्षायते
यस्याङ्गेऽखिललोकवल्लभतमं शीलं समुन्मीलति ।।

अर्थ –  शील हा गुण सर्व लोकांत प्रिय आहे. शीलयुक्त व्यक्तीसाठी अग्नी क्षणात पाण्यासारखा शीतल होतो. समुद्र नदीप्रमाणे लघु होतो. मेरु पर्वत लहान शिलेप्रमाणे होतो. सिंह हरिणाप्रमाणे समान्य होतो. साप माळेचा गुण धारण करतो. तसेच विष  जणू काही त्याचेवर अमृताची वर्षा करते.  शील या गुणाचे महत्व या श्लोकात भर्तृहरींनी सांगीतले आहे.

लज्जागुणौघजननीं जननीमिवस्वा
मत्यन्तशुद्धहृदयामनुवर्तमानाम्।
तेजस्विनः सुखमसूनपि सन्त्यजन्ति
सत्यव्रतव्यसनिनो न पुनः प्रतिज्ञाम् ।।

अर्थ –  ज्यांना सत्यव्रत हेच व्यसन आहे, असे तेजस्वी लोक सहजच प्राणत्याग करतात, पण लज्जा गुणास उत्पन्न करणा–या, अत्यंत विशुद्ध हृदयाच्या, आपल्या मातेसमान संरक्षित अशा प्रतिज्ञेचा त्याग करत नाहीत.  सत्यव्रती जनांचे आचरण कसे आदर्श असते, या विषयी कविराज भर्तृहरींनी येथे सांगीतले आहे.




ज्योतिर्मय साहित्य

खरे वैराग्य संतांजवळ असते कारण ते विवेकातून आलेले असते. स्माशनातून येताना वैराग्य येते.मैथुन नंतर ही ते येते. हे क्षण भंगूर असते. ज्यावेळी अंतःकरण मन बुद्धी ढळते त्या वेळी हे विचार वैराग्य आठवायला हवे. उत्तम वैराग्य विवेकातून येते.विवेक संतांजवळ असते.

**कथा ऐकता ऐकता धावते संकलन**
**मधुकर बोरीकर, 9403061886**

चंद्र तेथे चंद्रिका, शंभू तेथे अंबिका.. यातही हे स्पष्ट होते. मनाच्या उपशमाचा  विचार वशिष्ठानी सांगितला. मनाला देवाचा चरणी समर्पित करणे. त्यास आवरता यायला हवे. आपले मन कोठे धावू नये, मन स्थिर असावे या मनोनाश करणे गरजेचे असते..सरूप, अरूप मनोनाश असे दोन प्रकार आहेत.मनाला शांत,निश्पंद करायचे तर ज्ञानाने, संत संगती,योग,प्राणायाम या द्वारे करावे.माणसाचे जीवनाचे अधिष्ठान हे विचाराचे आहे. रणांगणात गीतेचा उपदेश देताना कृष्ण व अर्जुन हे कसे होते तर अस्थिर मनाचा कृष्ण म्हणजे अर्जुन, आणि स्थिर मनाचा अर्जुन म्हणजे कृष्ण. या दोघात देहाच्या शिवाय अन्य फारसा फरक नव्हताच. मनाच्या बोधा साठी संत वांगमय असते. विश्वामित्र सोबत राम व लक्ष्मण सोबत गेली. विश्वामित्रांनी रामास अनेक अस्त्रे दिली,शस्त्रे दिली जी भगवान शंकराकडून मिळविली होती. अस्त्रे मंत्र सामर्थ्यावर अवलंबून होते. विश्वामित्रांनी रामचंद्र प्रभूला ज्ञानसंपन्न केले. वसिष्ठानी प्रभु रामास ज्ञान दिले तर  विश्वामित्रांनी त्यांना कर्माचे अधिष्ठान दिले. कर्माला निर्दोष ज्ञानाचे डोळे हवेत. ज्ञान आंधळे व कर्म दूषित हे उपयुक्त नाही. दोन्हीं असावेत. जीवनाची धन्यता ज्ञानाने होतेच, पण कर्मनिष्ठता नसेल तर जीवन निरर्थक होईल.  **(क्रमशः)**




## वजन कमी करण्याचे प्रभावी उपाय

ज्योतिर्मय साहित्य

लठ्ठपणा एक आजार असून यामुळे केवळ पर्सनॅलिटी खराब होत नाही तर हा इतर आजारांनाही आमंत्रण देतो. लठ्ठपणा वाढल्यास हाय ब्लडप्रेशर, कंबरदुखी, हृदयाचे आजार, गुडघेदुखी यासारखे आजार होण्याचा धोका वाढतो. यामुळे वजन कमी करण्यासाठी लोक डायटिंग करतात किंवा तास न् तास जिममध्ये घाम गाळतात परंतु तरीही वजन कमी होत नाही. कारण त्यांचा डाएट चार्ट योग्य नसतो. आहाराकडे योग्य लक्ष आणि थोडासा व्यायाम केल्याने वजन लवकर कमी करणे शक्य आहे. २१ दिवसाचा डायट प्लान आहे त्यांनी लवकर वजन कमी होते. कोणतेही साईड इफेक्ट नाही  कोणतेही आजार होत नाहीत. आणि असतील तर तेही जातात.

१. पपईचे नियमित सेवन करावे. हे फळ प्रत्येक ऋतूमध्ये मिळते. पपईचे सेवन केल्याने शरीरावरील अतिरिक्त चरबी कमी होते.

२. दह्याचे सेवन केल्याने चरबी कमी होण्यास मदत होते. दिवसातून दोन–तीन वेळेस ताक प्यावे.

३. पिंपळाच्या सालीचे चूर्ण भाजून घ्या, दररोज तीन ग्रॅम हे चूर्ण ताकामध्ये टाकून घेतल्यास बाहेर आलेले पोट कमी होईल.

४. आवळा आणि हळद समान मात्रामध्ये बारीक करून चूर्ण तयार करा. हे चूर्ण ताकामध्ये टाकून घ्यावे. या उपायाने वजन जलद गतीने कमी होऊ लागेल.

**संकलन –**
**डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)**
**पिंपरी–चिंचवड, पुणे.**
**आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक**
**संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९**


५. वाढते वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी टोन्ड दुध, टोन्ड दही आणि टोन्ड पनीरचा वापर करावा. या पदार्थांमध्ये कॅलरी कमी असतात, परंतु पोट भरलेले जाणवते.


६. दररोज सकाळी आणि संध्याकाळी चालावे. कमीत कमी ४–५ किलोमीटर जलद चालण्याचा नियम करावा. दुपारचे जेवण केल्यानंतर शतपावली अवश्य करावी. जर तुम्ही रात्री ८:३० नंतर जेवण करत असाल तर पोळी आणि भाताऐवजी डाळ आणि भाज्यांना जास्त प्राथमिकता द्या. रात्री हलका आहार घ्यावा. शक्यतो रात्री शक्य तितक्या लवकर म्हणजे ७ च्या आतच जेवण उरकावे.

७. वजन लवकर कमी करण्याची इच्छा असेल तर जास्तप्रमाणात पांढरे पदार्थ (बटाटे, मैदा, साखर, तांदूळ) कमी करा आणि मल्टीग्रेन किंवा मल्टीकलर पदार्थ ( डाळी, गहू, गजर, पालक, सफरचंद, पपई) खाण्यावर जास्त भर द्या.

***

# रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

छोटी छोटी पण आशय प्रधान असलेली कवितांची कडवी, प्रबोधनाचा संदेश देणाऱ्या पद्य रचना आणि त्याचे जोडीला तालवाद्यांचे सूर या माध्यमातून रवींद्रसंगीत सहजपणे जनमानसात पोहोचले आणि लोकप्रियही झाले.

आपल्या संगीतकारकिर्दीच्या तिसऱ्या टप्प्यामध्ये त्यांनी आपल्या गीत आणि संगीतात आणखी वेगवेगळे प्रयोग केले. शास्त्रीय संगीत आणि लोकगीतांमध्ये त्यांनी आपल्याला हवे त्याप्रमाणे बदल करण्याचा प्रयत्न केला. भारतीय संगीतात माहिती नसलेला कंपोझिशन हा नवीन प्रकार त्यांनी रूढ केला आपल्या संगीत प्रवासात दोन ते अडीच हजारांपेक्षा जास्त गीते लिहून स्वत: त्यांना चाली लावल्या त्याचप्रमाणे त्यांनी नाटक, संगीत आणि नृत्य या तीन कलांचा अद्भुत असा त्रिवेणी संगम घडवून आणला. रवींद्रनाथांचे संगीत हे अस्सल भारतीय असून आज बंगालमधील घराघरांमध्ये तसेच देशाच्या विविध भागांमध्ये निनादत आहे. त्याचे कारण म्हणजे त्याची लोकाभिमुखता आणि हृदयाला भिडण्याची क्षमता.

रवींद्रनाथ स्वत: उत्कृष्ट गायक होते राष्ट्रीय काँग्रेसचे कलकत्त्यात जेव्हा अधिवेशन झाले तेव्हा त्यांनी वंदे मातरम हे गीत अत्यंत तन्मय होऊन म्हटले. त्यांनी गायलेल्या गीतांचा श्रोत्यांवर दीर्घकाळ प्रभाव असायचा. त्यांचे आमार शोनार बांगला हे बांगलादेशचे राष्ट्रगीत असो की आपल्या देशाचे राष्ट्रगीत जन-गण-मन या त्यांच्या रचना अत्यंत अप्रतिम आहेत. आपल्या देशावर तर त्यांचे सर्वच क्षेत्रातील कायमचे न फिटणारे ऋण आहे. रवींद्र संगीताचा प्रभाव बंगालमधील घराघरात आहे. रोबिन्द्रो शोंगीत म्हणून ते प्रसिद्ध आहे. बंगालमध्ये त्याला लोकसंगीताचे मोल प्राप्त झाले आहे. अनेक संगीतकार आणि कवींनी रवींद्र संगीतापासून प्रेरणा घेतली. बॉलिवूडमधील अनेक गीते रवींद्र संगीतावर आधारित आहेत. रवींद्रनाथांनी या क्षेत्रातही एवढे प्रचंड काम करून ठेवले आहे की त्याचा मागोवा घेतल्याशिवाय संगीतकार आणि गायकांना पुढे जाता येत नाही. ''जोदी तारे नाइ चीनी गो शेकी'' हे रवींद्र संगीतातील गाणे वेगवेगळ्या गायकांनी गायले आहे. लिजंडरी सिंगर किशोरकुमार यांनी तर हे गाणे इतके अप्रतिम म्हटले आहे की ऐकताना जणू आपली समाधी लागते. जिज्ञासूंनी हे गीत यु ट्यूबवर अवश्य ऐकावे. याच गीताचा वापर अभिमान चित्रपटातील तेरे मेरे मिलन की ये रैना या गीतात फार सुंदर केला आहे. तसेच चंदा देखे चंदा हे झूठी चित्रपटातील गाणे आमी तोमाय जातो या मुखड्यावरून आणि जोदी तारो या गीतावर आधारित आहे. जलते है किसके लिये, जाये तो जाये कहा, मेघा छाये आधी रात, छुकर मेरे मन को यासारखी अनेक गाणी रवींद्र संगीतावरून प्रेरणा घेऊन जन्माला आली आहेत. संगीतकार अनिल विश्वास, आर डी बर्मन, हेमंतकुमार, सलील चौधरी आदी अनेक संगीतकारांनी रवींद्र संगीताचा वापर आपल्या गीतांमध्ये करून घेतलेला दिसतो. रवींद्रनाथांनी लिहिलेले एकला चलो रे या गाण्याचा वापर तर अनेक संगीतकारांनी आणि गायकांनी वेगवेगळ्या प्रकारे आपल्या कार्यक्रमात केला आहे. संगीत म्हणजे दोन आत्म्यानमधील दुवा असे रवींद्रनाथ म्हणत असत. त्यांच्या संगीताच्या धाग्याने खरे तर संपूर्ण भारतवर्ष जोडले गेले आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी-न्यायप्रिय, आदर्श प्रशासक व समाज सुधारक

ज्योतिर्मय साहित्य

भारताच्या इतिहासाचा भूतकाळ समजून घेताना असे लक्षात येते की भारतात आदर्श राज्यकर्त्यांमध्ये केवळ पुरुष राज्यकर्तेच होते असे नाही तर काही महिला राज्यकर्ता देखील होत्या की ज्यांनी आपल्या राज्याचा किंवा संस्थानाचा राज्यकारभार आपल्या कार्य व कर्तुत्वाच्या बळावर अतिशय आदर्श पणे चालवून लोककल्याणकारी राज्याची संकल्पना साकार केली. लोक कल्याणाची कार्ये करून भारताच्या इतिहासात सुवर्ण अक्षराने नोंद झालेल्या आदर्श महिला राज्यकर्त्या म्हणजेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर होय.

इतिहासाने पानोपानी
जिची गाईली गाथा।
होळकरांची तेजस्वी ती
पुण्यश्लोक माता।।

लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांनी एका राज्याच्या प्रमुख राज्यकर्त्या म्हणून जी कार्ये केली ती आजच्या लोकशाहीतील शासनासाठी सुद्धा मार्गदर्शक आहेत. राज्यकारभार करत असताना जनतेप्रती उत्तरदायित्व, आत्मीयतेची भावना, जबाबदार राज्य कारभार, कायद्याचे राज्य, निष्पक्ष न्यायव्यवस्था, उत्कृष्ट प्रशासन व्यवस्था, धाडसी निर्णय क्षमता, सामान्य व दुर्बलांना न्याय अशा स्वरूपाची कल्याणकारी कार्ये करून यामागे त्यांच्या आदर्श राजकारणी व उत्तम प्रशासक असल्याचा दृष्टिकोन दिसून येतो

भारताच्या इतिहासात १७६६ ते १७९५ या २९ वर्षाच्या कालावधीत लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या नेतृत्वाखाली एक समृद्ध गौरवशाली कल्याणकारी ज्याला शिवरायानंतरचा सुवर्णकाळ म्हणता येईल असे एक लोकराज्य होते. होळकरांचे इंदोर राज्याच्या लोकमाता अहिल्याबाई होळकर या मराठा इतिहासातील कर्तृत्ववान राज्यकर्त्या होत्या. संकटाच्या परिस्थितीत आलेली राजकीय जबाबदारी, शत्रूंची चाल अशा परिस्थितीत न डगमगता पारदर्शक राज्यकारभार सांभाळून प्रजेचे हित, वैराग्य भावना, अनेक कल्याणकारी कार्ये, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक धार्मिक कार्ये यांची ओळख आजच्या पिढीला होणे गरजेचे आहे. एक आदर्श राज्यकर्ता कसा असावा व लोक कल्याणकारी राज्य कसे चालवावे याचे मूर्तिमंत आदर्श उदाहरण म्हणजे लोकमता अहिल्यादेवी होळकर होत.

लोकमाता अहिल्याबाई होळकर यांच्या आदर्श लोक कल्याणकारी प्रशासनामुळे त्यांना लोकमाता, पुण्यश्लोक, देवी, गंगाजळ निर्मळ या सगळ्या पदव्या लोकांनी अर्पण केल्या. एक राज्य शासक म्हणून त्यांचे कर्तृत्व फार महत्त्वाचे आहे. अपार शहाणपणा आणि तडप असणारी ती अलौकिक स्त्री होती. आदर्श न्याय रचना, रणनीती याची त्यांना उत्तम जाण होती. एका नजरेत हिशोब करण्यात त्या तरबेज होत्या. त्या स्वत: रणांगण गाजवत. शस्त्रज्ञान व ते चालविण्यात त्या तरबेज होत्या. त्यांनी स्त्रियांचे सैनिक दलही तयार केले होते. मातृभूमी विषयी निष्ठा, बाणेदार वृत्ती, साधी राहणी, उच्च चरित्र हे त्यांचे विशेष! त्यांचे कौटुंबिक जीवन अनेक दु:ख व कौटुंबिक समस्यांनी ग्रस्त होते. परंतु त्यांचे प्रशासन एक आदर्श धवलशुभ्र निष्कलंक होते. या संदर्भातील नोंदी इतिहासात नमूद झालेल्या आहेत व त्यांच्या चरित्राचे मनमोहक रूप दाखविणाऱ्या आहेत. त्यातील एक नोंद म्हणजे एकदा हिशोब बघताना पती खंडेरावाच्या वर्षाच्या पगारातील रक्कम दोन महिन्यातच संपली होती. तेव्हा स्वतःच्या पतीला सुद्धा पैसे देण्यास अहिल्याबाईनी नम्रपणे नकार दिला. तेव्हा पती खंडेरावांनी रागाने हिशोबाची वही भिरकावून दिली. तेव्हा अहिल्याबाईनी आदेश दिला की खतावणीची बेअब्रू करणाऱ्याचा जबाब लिहून घ्या व त्यांना २५ मोहरांचा दंड ठोका. वसूल करून घ्या. अशा प्रकारे एक आदर्श प्रशासक म्हणून त्यांनी कोणाशी भेदभाव न करता स्वतःचे कर्तव्य कार्य पूर्ण केले. प्रत्यक्ष पतीलाही दंड ठोकून वसूल करणारी कठोर शिस्तीत राज्यकारभार राबविणारी एक आदर्श प्रशासक म्हणजे लोकमाता अहिल्यादेवी होळकर होत.

एक आदर्श प्रशासन व्यवस्था चालवताना सरकारी खर्च व खाजगी खर्च याबाबत त्यांचा कटाक्ष होता. कुठल्याही खाजगी खर्चाची पै सुद्धा सरकारी तिजोरीतून येता कामा नये यावर त्यांचे लक्ष असे. याबाबतीत त्यांचा धाक तेवढाच जबर होता. कारण प्रजेच्या प्रत्येक सुखासाठी अहिल्याबाई जागरूक होत्या. विधवांचा स्त्रियांचा छळ करणाऱ्यांना क्षमा नव्हती.

लोकमाता अहिल्यादेवी यांनी योग्य राज्य कारभार व प्रशासन चालवता यावे यासाठी राजधानी महेश्वर निर्माण केले. यामध्ये अहिल्यादेवींनी नर्मदातीरी सुंदर घाट बांधले. कलापूर्ण मंदिरे बांधली. नव्या पेठा, हवेल्या, संस्कृत पाठशाळा निर्माण केल्या.यामुळे नामवंत वैद्य, विद्वान व कलावंतांना राजश्रय मिळाला. मुलींची पाठशाळा, स्त्रियांना शस्त्र शिक्षण हे काम त्यांनी सुमारे २०० वर्षांपूर्वीच सुरू केले होते. जिल्हा परिषदा, खेड्यापर्यंत न्यायव्यवस्था, कुटीर उद्योग, हुंडाबंदी, दारूबंदी हे सारे कार्यक्रम अहिल्यादेवींनी त्या काळात सुरू केले. जंगल तोडीस विरोध केला. तसेच हुंडा देणाऱ्यास व घेणाऱ्यास शिक्षा ठोठावल्या. कारण प्रजेचे रक्षण आणि त्यांच्या सुख सोयीकडे एक आदर्श प्रशासक म्हणून त्यांचे बारीक लक्ष असे. अन्नछत्रातून गोरगरीब आनंदाने भोजन करत. अशा या महेश्वर राजधानीतून एक आदर्श राजकारण व प्रशासन त्यांनी चालवले. अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. सुधारणा केल्या. प्रजेसाठी रात्रंदिवस राबणारी प्रजेची आई तिथे होती. पेशवे सुद्धा म्हणत की ''पुण्याचे पुण्यद्वार महेश्वर येथे आहे. यात महेश्वर नगरीचा आणि अहिल्यादेवीचा गौरव पुरेपूर भरलेला आहे.''

लोकमाता अहिल्यादेवी एक आदर्श प्रशासक तर होत्याच परंतु तेवढ्याच न्यायप्रिय होत्या. त्यांचे न्यायदान अचूक होते. म्हणूनच भांडणाऱ्या दोन्ही बाजू त्यांना दुवा देत. प्रजेला न्याय मिळावा म्हणून त्यांनी राज्यात अनेक ठिकाणी न्यायालय स्थापन करून त्यावर योग्य न्यायमूर्तींच्या नेमणुका केल्या होत्या. गावोगावी पंचायती स्थापन करून त्यांना न्यायदानाचे विस्तृत अधिकार बहाल केले. अहिल्यादेवीच्या कडक नियंत्रणाखाली ही न्यायालय व पंचायती न्यायदानाचे काम उत्तम रीतीने करीत असे.

लोकमाता अहिल्यादेवी यांनी प्रजेच्या व समाजाच्या हितासाठी व सुखासाठी अनेक लोक कल्याणाची कार्ये केलीत. म्हणूनच त्यांना थोर समाज सुधारक असे सुद्धा संबोधले जाते. कारण अहिल्यादेवी यांनी समाजातील सर्वच घटकांसाठी भेदभाव न करता कार्य केले. शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेतले. नैसर्गिक संकट आल्यास शेतसाऱ्यात सूट देत असत. कमी कर आकारणीमुळे प्रजा व शेतकरी सुखी होते. त्यांच्या कारकिर्दीत त्यांच्या राज्यात कधीच दुष्काळ पडला नाही. जागोजागी वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन केले. गुन्हेगारी कमी होण्यासाठी प्रयत्न केले व व्यापाऱ्यांनाही संरक्षण दिले. अहिल्यादेवींनी उद्योगांना गतिमानता दिली. हस्तोद्योग, गृह उद्योग सुरू करून स्त्रियांना सुद्धा स्वावलंबी बनवले. अशाप्रकारे खऱ्या अर्थाने अनेक समाजोपयोगी उपक्रम व सेवा योजना राबवून त्यांनी समाजसेवेचे कर्तव्य पार पाडले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांनी अध्यात्मिक क्षेत्रात सुद्धा अतिशय मोलाचे असे योगदान दिले. ठिकठिकाणी मंदिरे, नदी घाट, धर्मशाळा, विहिरी, बारव, रस्ते बांधले. १०० च्या वर मंदिरांचा जिर्णोद्धार केला. त्यांनी सुरू केलेल्या अन्नछत्र आणि पानपोया आजही समाजसेवेचा संदेश देतात. लोकांचे, पशुपक्ष्यांचे आणि शेतीची पाण्याची गरज भागवत गायगुरांसाठी कुरणे राखून ठेवली होती. रामेश्वर व सोमनाथ या रस्त्यांचे काम त्यांनी केले व संपूर्ण भारत जोडण्यासाठी प्रयत्न केले. विधवांसाठी वारसा हक्क व दत्तक घेण्याचा अधिकार कायद्याद्वारे मिळून दिला. त्यांची ग्रंथ संपदा मोठी होती. त्यांनी ''अहिल्या कामधेनु'' ग्रंथाची निर्मिती केली. विद्या, कला त्यांचे प्रणेते यांचा कोश त्यांनी बनवला.

लोकमाता अहिल्यादेवी यांच्याकडे धनसंपत्ती असूनही त्या कधीही विलासी जीवनात राहिल्या नाहीत. साधी राहणी व साधी जीवनशैली त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विशेष गुण होता. त्यांच्या आयुष्यात अनेक दु:खाचे डोंगर कोसळले तरी ही बाणेदार स्त्री कर्तव्य कठोर असा कर्मयोग आचरत राहिली आणि प्रजेचे सुखाला अंतिम सुख म्हणून बघत राहिली. म्हणूनच म्हणावेसे वाटते...


*जिने संतती मानिले स्वप्रजेला
जिने सौख्य सोयी दिल्या मातृभूमीला।
जरी दु:खीता तोष देई दुजाला
नमस्कार माझा अहिल्या मातेला।।

सुनिल मधुकर माथने
(शिक्षक/कवी/ग्रामगीताचार्य)
सिद्धिविनायक मंदिराजवळ,ज्योती नगर, जठारपेठ,
अकोला-४४४००५

# इंदापूरी निखारे



## मी लक्षाधीश झालो तर...



ज्योतिर्मय साहित्य

लहानपणी गुरुजी मस्त शिकवत असतात

वेगवेगळया विषयावर बोलायला लावतात आणि आपण पण बाळबोध पणे बोललेलो असतो

बाळबोध कायमच असतो

लक्षाधीश करणार सर्वांना...हे कोणीही म्हणाले

कितीही मोठे झालो तरी, आपण प्रचंड आनंदी होतो, लक्षाधीश या शब्दातच सामर्थ्य आहे

त्याचीच एक आठवण.

गुरुजी वर्गात आले आम्ही ५/६ वीत असु आल्या आल्या गुरुजींनी विषय दिला

मी लक्षाधीश झालो तर...

वर्गात कधी न बोलणारा मित्र एकदम जोरात ओरडुन म्हणाला सर मी, सर मी बोलतो

आम्ही सगळे मित्र अचम्बीत झालो आणि त्याच्याकडे पाहु लागलो, सर पण एक मिनिट त्याच्याकडे पहातच राहिले, परत हात वर करून जोरात ओरडला सर मी बोलणार, आणि सर म्हणाले ये तु बोल... पहिल्यांदाच बोलत असल्यामुळे सर्व मित्रांनी जोरदार टाळ्या वाजविल्या.. त्याने बोलायला सुरुवात केली...

माझे आदरणीय गुरु बंधु आणि भगिनींनो...

वर्गात एकही भगिनी नव्हती, तरीही ...

सर्व वर्ग शांतपणे ऐकण्यास उत्सुक झाला होता

तर आजचा विषय मी लक्षाधीश झालो तर

बंधूंनो मी जर लक्षाधीश झालो तर मी सर ज्याप्रमाणे आपल्यावर लक्ष ठेवतात त्या प्रमाणे मी पण ठेवीन... सगळे एकदम जोरात हसु लागले...

पुढे तो म्हणाला... मी जर सरपंच झालो तर गावावर लक्ष ...मी जर आमदार झालो तर जिल्ह्यावर लक्ष... मी जर मुख्यमंत्री झालो तर राज्यावर... मी जर पंतप्रधान झालो तर देशावर ...

आपले सर लक्ष कसे ठेवायचे हे शिकवत असतात सरांमुळे मी लक्षाधीश होण्याचे ठरविले...सगळा वर्ग हसून हसून बेजार... आणि तो मित्र मात्र आनंदात होता, त्याला वाटत होते लय भारी बोललो... अर्थात नंतर त्याला कळाले... पण तो बालपणीचा पहिला लक्षाधीश मित्र सगळ्यांचा झाला...आज खुप वर्षा नंतर जाणवले आपल्या आजुबाजुला सतत लक्षाधीश असतात ...

लहानपणी त्याला हसलो होतो... पण ते बरोबर होते... आणि आपली सगळ्यात जवळची लक्षाधीश आपली पत्नी असते... आता कोणी तोंड देखल म्हणत, मी सर्वांना लक्षाधीश करणार

आपण पण भाळून जातो.. अजूनही.. स्वप्नात, खोट्या आनंदात जगणं बहुतेक सर्वांना आवडत...



## जात्यावरच्या ओव्या......

जीवाला जड भारी
जाते उठत बसत
धाकल्या बाळाचा
वाडा वैद्याचा पुसत ||१०१

शीतल सावली
हाय आंब्या उंबराची
बाळाची ग माझ्या
बाजू मला डोंगराची ||१०२

संदर्भ- शांताई इंगळे
संकलन- सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

# प्रेमाची बहारदार गोष्ट.... अष्टपदी....

ज्योतिर्मय साहित्य



सशक्त कथानक, उत्कंठा वाढवणारी पटकथा, सहजसुंदर अभिनय, उत्तम लोकेशन्स,प्रयोगशील दिग्दर्शन आणि दर्जेदार निर्मितीमूल्ये यांच्या आधारे नुकताच प्रदर्शित झालेला 'अष्टपदी' हा सिनेमा काळजाला भिडतो.प्रेमाची एक वेगळी पण नितळ,सुंदर गोष्ट यानिमित्ताने अनुभवायला मिळणार आहे.

प्रेम या गोष्टीभोवती अनेक सिनेमे यापूर्वी आले आहेत.नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'अष्टपदी' या चित्रपटामध्ये प्रेक्षकांना आजवर कधीही न पाहायला मिळालेले उत्कंठावर्धक असे कथानक पाहायला मिळणार आहे.भारतीय संस्कृतीतील लग्न हा महत्त्वाचा घटक मानला जातो. या निमित्ताने केवळ दोन जीवांचे नाते जोडले जात नसून, दोन कुटुंब एकत्र येत असतात. या चित्रपटात भारतीय लग्नसंस्थेवर महत्त्वपूर्ण असे भाष्य करण्यात आले आहे. चित्रपटातील सर्वच कलाकारांनी दमदार अभिनय केला असून लोकप्रिय अभिनेता संतोष जुवेकरचे आजवर कधीही समोर न आलेले रूप प्रेक्षकांसमोर येणार आहे.त्याने साकारलेली भूमिका वाखाणण्याजोगी आहे. त्याच्या जोडीला अभिनव पाटेकर व मयुरी कापडणे या दोघांची केमिस्ट्रीही प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेण्यात सरस ठरली आहे

अष्टपदी मधील नयनरम्य लोकेशन्स आणि तिथे शूट करण्यात आलेली दृश्ये प्रेक्षकांचे मन मोहित करून टाकतात. संतोष जुवेकर आणि मयुरी कापडणे यांच्यासोबत या चित्रपटात अभिनव पाटेकर, मिलिंद फाटक, मोना कामत, स्वप्नील राजशेखर, माधव अभ्यंकर , विशाल अर्जुन, विनिता काळे, चंदा सारसेकर, कल्पना राणे, उत्कर्ष जैन, महेंद्र पाटील, नयना बिडवे, जगदीश हाडप, महेश जोशी आदी कलाकारांची फौज आहे. गीतकार गणेश चेऊलकर आणि प्रशांत जामदार यांनी लिहिलेली गाणी संगीतकार मिलिंद मोरे यांनी संगीतबद्ध केली असून, पार्श्वसंगीतही त्यांनीच दिलं आहे. धनराज वाघ या चित्रपटाचे सिनेमॅटोग्राफर असून, निलेश रसाळ यांनी कला दिग्दर्शन केलं आहे. अतुल शिधये यांनी रंगभूषा, तर अंजली खोब्रेकर, स्वप्ना राऊत यांनी वेशभूषा केली आहे. नृत्य दिग्दर्शन दिग्विजय जोशी यांनी केले आहे. राहुल पाटील आणि नंदू आचरेकर या चित्रपटाचे सहदिग्दर्शक असून, कार्यकारी निर्माते अजय खाडे आहेत. महश्री प्रॉडक्शन आणि युवराज सिने क्रिएशनच्या बॅनरखाली निर्माते उत्कर्ष जैन आणि महेंद्र पाटील यांनी 'अष्टपदी' चित्रपटाची निर्मिती केली आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शनही निर्माते उत्कर्ष जैन यांनीच केले आहे. क्रिएटिव्ह दिग्दर्शक महेंद्र पाटील यांनी कथा, पटकथा आणि संवाद लेखन केलं आहे.

विवाहामधील एक महत्वाचा विधी म्हणजे सप्तपदी. सप्तपदी म्हणजे हिंदू विवाह विधीमध्ये वधू आणि वर एकत्र सात पावले (किंवा फेरे) घेतात, जे सात जन्मांचे बंधन दर्शवते. हे एक महत्त्वाचे संस्कार आहे, ज्यात वधू-वर एकमेकांना सात वचनं देतात. या विधीमध्ये वधू-वरांसमोर तांदळाच्या सात राशी ठेवल्या जातात. सात मंत्रांच्या जपाने वराने वधूला चालवत त्या बाजूला सारल्या जातात. एकेका राशीवर उजवे पाऊल ठेवत प्रत्येक पाऊल ठेवल्यावर मंत्र म्हणतात. त्यात हा सिनेमा अष्टपदी आठव्या वचनाबद्दल महत्वपूर्ण भाष्य करतो. उत्कृष्ट लेखन, मोजकी आणि प्रभावी संवादरचना, सुंदर संगीत, संवेदनशील अभिनय, आणि उच्च दर्जाचं दिग्दर्शन यामुळे 'अष्टपदी' हा चित्रपट केवळ एक मनोरंजनाचा अनुभव न राहता, तो अंतर्मनाला स्पर्श करतो. या सिनेमाची गोष्टी साधी सरळ वाटत असली तरी त्या कथानकात अनेक रंजक गोष्टी लपलेल्या आहेत. एका संगीत विद्यालयात शिकणारे दोन विद्यार्थी प्रेमात पडतात. पण त्या संगीत विद्यालयाच्या शिक्षिका यांनी एक अनोखे वचन त्यांच्या विद्यार्थ्यांकडून घेतलेले असते. संगीत विद्यालयातील विद्यार्थी यांनी एकमेकांच्या प्रेमात पडायचे नाही. हे वचन देण्यामागे त्या शिक्षकांचा भूतकाळ असतो. शेवटी जे व्हायचं ते होतंच. दोन विद्यार्थी हे प्रेमात पडतात आणि मग त्यांच्या आयुष्याला एक वेगळं वळण मिळते. त्यात अभिनव पाटेकर व मयुरी कापडणे यांनी साकारलेली प्रियकर-प्रेयसीची भूमिका लक्षवेधी झाली आहे. अभिनव यांनी साकारलेला गायक चपखल वाटला तर मयुरी यांनी देखील त्यांच्या भूमिकेला उत्तम न्याय दिला आहे. या दोघांच्या आयुष्यात तिसरा व्यक्ती येतो जो मयुरीच्या प्रेमात पडतो आणि तिच्याशी लग्न करण्याचा हट्ट धरून बसतो. तो म्हणजे माजी आमदार यांचा मुलगा. मग तेथून सिनेमाला गती प्राप्त होते आणि एकेक गोष्टी भारी वाटायला लागतात. 'कुणीच नसावं अवतीभवती, समोर तू असताना' अशा काव्यरचनेने 'अष्टपदी'मध्ये संतोष जुवेकर यांनी साकारलेला विक्रांत लक्षात राहतो.आमदाराचा मुलगा त्याने उत्तम साकारला आहे. संतोषच्या रूपातील कवीमनाचा नायक दिसतो आणि त्याने जिच्यासाठी हे काव्य म्हटले ती नायिका मयुरी कापडणेही लक्ष वेधून घेते. चित्रपटातील सर्वांच्या भूमिका समर्पक झाल्या आहेत. प्रेमाचे विविध रंग उधळणारी दृश्ये या सिनेमात ठासून भरलेली आहेत, जी 'अष्टपदी'बाबत उत्सुकता वाढवतात. उत्तम कथानक ,दर्जेदार अभिनय व गोष्टीला अनुरूप असणारी गाणी यामुळे सिनेमाला एक वेगळी उंची प्राप्त होते. याला सुमधूर गीत-संगीत आणि अर्थपूर्ण संवादांची जोड देण्यात आली आहे. थोडक्यात काय तर या चित्रपटात प्रेमाची अनोखी व्याख्या या सिनेमात पाहायला मिळणार आहे.

सिनेमाची सुरुवात छानश्या गाण्याने होते. कोल्हापुरातील उत्तम निसर्गसौंदर्य कॅमेरात अचूक टिपले गेले आहे. सहजसुंदर लोकेशनमुळे नजर पडद्यावरून हटत नाही. हिरवाई ठासून भरलेली आहे यामुळे प्रत्येक सीन हा बहारदार होतो. नायक आणि एक नायिका असलेल्या या चित्रपटात खरं प्रेम कुणाला मिळतं, हे पाहणं उत्सुकतेचं ठरणार आहे. सशक्त कथानक, उत्कंठा वाढवणारी पटकथा, सहजसुंदर अभिनय, प्रयोगशील दिग्दर्शन आणि दर्जेदार निर्मितीमूल्ये यांच्या आधारे अष्टपदी हा चित्रपट प्रेक्षकांच्या मनावर गारूड घालतो. हा चित्रपट प्रेमाची नवी व्याख्या मांडणारा आहे. प्रेमाचे आजवर कधीही समोर न आलेले पैलू पाहताना प्रत्येक रसिकांना कुठे ना कुठे त्यात आपले प्रतिबिंब दिसेल. अष्टपदी या सिनेमात सांगण्यात आलेले महत्वपूर्ण असे आठवे वचन काय आहे ते तुम्हाला सिनेमागृहात सिनेमा बघितल्यावरच कळेल. आजच्या काळातील नातेसंबंधांवर भाष्य करणारा हा चित्रपट म्हणजे सर्वतोपरी मनोरंजनाचे परिपूर्ण पॅकेज असल्याचे 'अष्टपदी' पाहताना जाणवते.एकत्र कुटूंबाने आनंद घ्यावा असा संगीतमय प्रेमाची नितळ गोष्ट असलेला अष्टपदी हा मराठी चित्रपट आवर्जून बघावा असाच आहे.

चित्रपट- अष्टपदी
भाषा- मराठी
निर्मिती-महश्री प्रॉडक्शन व युवराज सिने क्रिएशन
दिग्दर्शक- उत्कर्ष जैन
लेखक- महेंद्र पाटील
कॅमेरामन- धनराज वाघ
गीतकार-गणेश चेऊलकर व प्रशांत जामदार
निर्माता-उत्कर्ष जैन
कलाकार- अभिनव पाटेकर, संतोष जुवेकर, मयुरी कापडणे,मिलिंद फाटक, मोना कामत, स्वप्नील राजशेखर, माधव अभ्यंकर , विशाल अर्जुन, विनिता काळे, चंदा सारसेकर, कल्पना राणे, उत्कर्ष जैन, महेंद्र पाटील, नयना बिडवे, जगदीश हाडप व महेश जोशी आदी..



आशिष निनगुरकर



## फुलमाला....

बत्तीस मोगरा...

सुबक गोल गुच्छात
उमलतो हजारी मोगरा
गुलाबी कळया याच्या
पण फुलांचा रंग पांढरा

सहज कुठेही उगवते
या फुलांचा गंध मंद
हिरव्या पानांत रूप खुले
बघताना मिळे आनंद

सौ.माधुरी म.इनामदार, मिरज.






## आठवणीतले बालपण

मित्रांनो, प्रत्येकाच्या आयुष्यात बालपणीचे विशेष महत्व असते, रम्य ते बालपण, खरंच बालपणीसारखी मज्जा परत कधीच येत नाही आता ते दिवस आठवले तरी मन खूप प्रसन्न होतं, तर आपण सर्वजण परत एकदा त्या बालपणीच्या विश्वात जाऊया, त्या आठवणींना एकदा उजाळा देऊयात ज्योतिर्मयच्या माध्यमातून. मग लिहायला सुरुवात करा व पटकन पाठवा मला 7743918559 या व्हाट्सअप नंबरवर

- संजय व्यापारी, संपादक,
ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ.


# संत मीराबाई

ज्योतिर्मय साहित्य

मीराबाई ह्या एक थोर संत होत्या, त्या राजस्थान मधील स्त्री संत व कवियत्री आहेत, आणि राजकुमारी होत्या माता पिता त्यांचे वीर कुमारी आणि राठोड रतन सिंग होते, वीर राव दुधाचे यांचे त्या नातू होत्या आणि जोधा जोधपूर संस्थांचे ते संस्थापक होते त्याचा जन्मगाव चौकडी अथवा कुडकी म्हणून होतं जन्म १४९८ च्या आसपासचा आणि कुवर भोजराज मेवाडचे महाराजा सांगा हे त्यांचे पती होते आणि मीराबाईची आई बालपणीच वारली व वडील सतत युद्धामध्ये राज्याच्या सीमा वाढवण्यात मग्न असल्यामुळे मीराचा सांभाळ तिच्या आजी–आजोबांनी केला तिचे आजोबा राव दुधाचे वैष्णव श्रीकृष्णाचे भक्त होते त्यामुळे मीराला बालपणापासून श्रीकृष्णाचा लळा लागला होता मीरा राजस्थान मधील मेढत्याची मिळता ही एक जहागिरी होती सर्वात धाकट्या मुलाची राहणार रतन सिंहाची ती मुलगी होती राव दुधाजी साधू संतांचा सन्मान करीत त्यांच्याकडे नित्य कोणी ना कोणी अतिथी येत असत अर्थातच त्यांचा मुक्काम महालात असायचा एक दिवस संत एक एक दिवस नंतर रविदास त्यांच्याकडे मुक्कामाला आले ते संत रामानंदांचे शिष्य होते व ते वैष्णव सांप्रदायाचा प्रचार करीत त्यांच्याकडे एक सुंदर अशी श्रीकृष्णाची मूर्ती होती ते स्वतः त्या मूर्तीची पूजा करीत असत मिरेला ती मूर्ती खूपच आवडली होती हवी मला हवीच असा तिचा हट्ट होता आजोबांनी तिचे समजूत काढली पण मिरेला ती मूर्ती हवीच होती संत रविदास पुढच्या मुक्कामी निघून गेले मीराने रडून रडून आकांत मांडला तिने खाणे पिणे टाकले दुसऱ्या दिवशी संत रोहिदास महालात परत आले व त्यांनी ते मूर्ती स्वतः मिळेल सुपूर्त केली ते म्हणाले राणाजी गेल्या रात्री प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्ण स्वप्नात आले आणि म्हणाले तुम्ही फक्त माझ्यावर गंध फुले वाहत बसलेले आहात एकदा लवकर मीराला माझे मूर्ती देऊया व माझ्या आराध्य दैवाचा अज्ञाने मी तातडीने इथे आलो आहे संत रोहिदासांनी मिरेला आशीर्वाद दिला व मूर्ती दिली व ते निघून गेले तेव्हापासून ती मूर्ती मीराबाईकडेच होती.

आपल्या आजोबांच्या छत्रछायेखाली मीरा लहानाचे मोठे झाले लिहिणे वाचणे नृत्य व संगीताचे शिक्षण तिला मिळाले अनेक कलाकारांमध्ये कलांमध्ये ती प्रवीण होती तिने अनेक रचना केल्या भजने लिहिली भक्ती भाव कल्पनाविलास सुंदर शब्दांचे निवड व रागदारी यामुळे मिरची भजने फारच लोकप्रिय झाले याला कारण तिच्या मनात भगवान श्रीकृष्ण कायमचे ठाण मांडून

दुधाची च्या मृत्यूनंतर त्यांचा मोठा मुलगा बीरमदेव गादीवर बसला त्याने चित्तोडच्या राणा सांगा यांचे पुत्र भोजराज यांच्याशी इसवी सन पंधराशे सोळा मध्ये मिरचे लग्न लावून दिले राणा सांगा अतिशय सुपूर्व पराक्रमी होते त्यांनी मुघलांचे सत्ता कधीही मान्य केली नाही ते मोघलांचे सतत लढत राहिले राजा भोज सुद्धा पित्याप्रमाणे शूर होता प्राचीन काळापासून त्यांचा घराण्यात देवीची दुर्गा काली चामुंडा पार्वती यांची पूजा होत असेल मीराच्या लोकांना विशेष करून तिच्या सासूबाईना मिरची श्रीकृष्ण भक्ती मान्य नव्हती त्यांचा खूप विरोध होता परंतु भोजराजाने समजूतने घेतल्यामुळे ती बाकीच्यांची बोलणी शांतपणे ऐकून घेत होती ती खूप वेळ श्रीकृष्णाचे ध्यान धारणेत घालवीत होती साधू संतांचा सहवास तिला खूप आवडू लागला शेवटी भोज राजाने तिला महालाच्या शेजारी मंदिर बांधून दिले भक्तीसाठी मीरेला स्वतंत्र व योग्य असे स्थान मिळाले . आता मीरा मुक्तपणे प्रभूची भजने गायीची व सासरच्या लोकांनी तिला वेडे ठरवले परंतु तिची कीर्ती ऐकून अनेक लोक तिच्या आशीर्वादासाठी जमू लागले हे सगळे राजघराण्याच्या प्रतिष्ठेला तडा देणारे होते त्यामुळे सासरची लोक जास्त चिडून होते



दुर्दैवाने पंधराशे तेवीस मध्ये भोज राजाच्या युद्धात जखमी झाल्यामुळे मृत्यू झाला पंधराशे सत्तावीस मध्ये वडील रतन सिंग हे देखील कन्वहाच्या नंतर राणा सांगा व भोज राजाचे बंधू रत्न सिंग हे देखील मरण पावले या मृत्यू चक्रामुळे मीरा जास्तच विरक्त होत गेली व गिरीधर गोपाळच्या अधिकच मनन म्हणून व चिंतनात रमले भोज राजाच्या सावत्र भाऊ विक्रमादित्य हा मेवाडचा सत्ताधीश झाला होता त्याला मीराबाईचे नाचणे गाणे अजिबात पसंत नव्हते त्याने नाना प्रकारे तिचा छळ सुरू केला त्याने तिला ठार मारण्याचे अनेक प्रयत्न केले त्याचे उल्लेख मीरा पदावली मध्ये मिळतात त्यातला एक म्हणजे राणे भेजा जहर पियाला इमरत करपी जाना याचा अर्थ राणाने पाठवलेला विषयाचा प्याला अमृत समजून पिऊन टाकला दुसऱ्या म्हणजे साप पिटारो राणाजी भेजो हस हस मेरा कंठ लगायो यह तो महारा नवसर हार येतो मारा नौ सरकार याचा अर्थ राणा जिरणे राणाजी ने फुलांबरोबर पेटार्यातून साप पाठवला साप आठवला तो बिर्याणी गळ्यात घातला हा तर माझा तारणहार असे म्हणाले

सुल सेज राणाने भेजी थी जो मेरा सुला है सांज भाई मेरा सोवन लागी मानो फुल बिछाय राणाने अंथरुण पाठवले त्यात त्याने धारदार काट्यारी चाकू अशा प्रकारे घातले कि मीरा त्याच्यावर झोपल्यास सर्व अंगावर जखमा होतील व तिचा मृत्यू होईल परंतु तिला एकही जखम झाली नाही सास लडे मेरी नणंद खिजावे राणा रह्या रिसाय अर्थ सासू भांडते नणंद टोमणे मारते राणा रागावून बसला आहे. त्याने दारात चौकी पाहारे बसवले आहेत कुलूप लावून कोंडून घातले अश्या विविध प्रकाराने छळ झाला

मीरेने तुलसीदासना पत्र लिहिले तुम्ही मला आई वडील गुरु भगवंता समान आहात इतका छळ होत असताना माझ्या साठी काय उचित आहे ते कळवा लिहून समजावून सांगा संत तुलसीदासानी मार्गदर्शन केले व कळविले कि ज्यांना ई श्वर अवतारा विषयी प्रेम वाटत नाही अशा लोकांना, मग ते कितीही जवळचे असले तरी त्यांना पराकोटीचे वैरी मानून त्यांचा त्याग करावा आपल्या इतिहासात असे दाखले आहेत उदा –प्रल्हाद, विभीषण, बळीराजा वगैरे घरचे तिला नावे ठेवीत होते पण बाहेर तिचा लौकिक खूप वाढला होता छंदिस्त वेडी कुलकलंकिनी अशा पदव्या घरातुन मिळत असल्या तरी बाहेर चे लोक महान संत उच्च कोटीची भक्त कलीयुगातील राधा अशा शब्दांनी गौरवित होते. संगीत सम्राट तानसेनने, अकबरबादशाहच्या पुढे मीराबाईची खूप स्तुती केली व बादशहाच्या मनात तिला बघायची इच्छा निर्माण झाली पण शत्रूच्या राज्यात राजमहालत शिरून एका राजपूत स्त्री चे दर्शन घेणे अशक्य होते त्या मुळे अकबर व तानसेन दोघांनी साधूचा वेष धारण केला आणि ते चित्तोड ला पोचले त्यांनी मीराच्या महालात प्रवेश मिळवला मीराबाई आपल्या लाडक्या गिरीधर गोपाळाला आळवीत होती गात होती नाचत होती तन्मय झाली होती तिला जगाचे भान नव्हते तिचा मधुर आवाज ऐकन व तन्मयता पाहुन अकबर सुद्धा भारवला त्याच्या मनात भक्ती भाव जागा झाला. वेष बदलून खोटेपणा करुन आल्या बद्दल त्याला लाज वाटली. खरे बोलणे धोक्याचे होते. मीरा चे लक्ष नसताना गळ्यातला मौल्यवान हार त्याने मीरेच्या पायापाशी ठेऊन तिथून निघुन गेला. जाता जाता कृष्णा साठी आहे असे सांगुन गेला. पण घात झाला इतका देवाच्या गळ्यातला इतका महाग हार कोठुन आला असा प्रश्न ज्याला त्याला पडू लागला सरते शेवटी तो हार अकबरचा असल्याचा एका सोनारा कडुन समजले आता मीरेच्या छळा मध्ये जास्तच भर पडली आणि ती जास्त जास्त कृष्णाशी जोडली जाऊ लागली स्वतः चे दुःख ती कृष्णाला सांगू लागली

तिचे पद बघा

मेरे तो गिरीधर गोपाळ दुसरा न कोई
जा के सिर मोर मुकुट मारो पती सोई
तात मात भ्रात बंधु अपना नही कोई
छोड दई कुल कि कान क्या करेगा कोई
संतन ढिग बैठ बैठ लोक लाज खोई
असुवन जल सीच सीच प्रेम बेल बोई

अर्थ एक आई मै भक्ति जान जगत देख मोही


दास मीरा गिरीधर प्रभु तारो अब मोही

अर्थ एक मात्र गिरीधर गोपाळ तेवढा माझा आहे दुसरे कोणी नाही ज्याच्या डोक्यावर मोर पिसांचा मुकुट आहे तोच माझा पती आहे. आई वडील भाऊ नातेवाईक कोणीही आपलें नाही मी माझ्या कुळाच्या सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत आता माझे कोण काय करू शकणार आहे साधु संतांच्या जवळ बसुन मी खोटी लाज सोडली, लोक काय म्हणतील ही भीती टाकुन दिली आहे.

आता हा वेल खूप फोफावाला आहे या वेलला आनंद रूपी फळ लागले आहे मी जगत भक्तीची व ज्ञानाची प्राप्ती करण्यासाठी आहे पण विनाकारण मी सौसारात. अडकले आहे ही गिरीधर गोपाळा, ही मीरा तुमची दासी आहे. तुम्हीच तिला तारा व उद्धार करा.

(क्रमशः)

॥ अध्यात्म ॥
डॉ. जोत्स्ना खलदकर
पुणे



# उपवासाचे सँडविच

ज्योतिर्मय साहित्य

उपवासाला सारखे खिचडी, थालीपीठ, भगर वगैरे तेच तेच पदार्थ खाऊन कंटाळा येतो.



अशावेळी तेच साहित्य वापरूनसुद्धा थोडेफार बदल केले तरी नवीन काहीतरी खाण्याचा आणि बनवण्याचा आनंद मिळतो. असाच एक पदार्थ आज आपण बनवूया.

साहित्य:

१ वाटी साबुदाणा, छान उकडलेले २ मोठ्ठे बटाटे, किंचीत लाल तिखट, ३..४ हिरव्या मिरच्या, कोथिंबीर, २ चमचे शेंगादाणे, असल्यास पाव वाटी डाळिंब दाणे, २ अननसाच्या चकत्या असल्यास, जिरे, पाव वाटी किंचीत जाडसर दाण्याचे कुट, २..३ चीज स्लाईस, चवीनुसार मिठ, २..३ चमचे साजूक तूप.

कृती:

प्रथम नारळाची हिरवी चटणी बनवावी. त्यासाठी नारळ, शेंगादाणे, जिरे, आलं, कोथिंबीर उपवासाला चालत असेल तर, चवीनुसार मिठ, साखर, हिरवी मिरची, लिंबाचा रस घालावा व मिक्सर मधून बारीक वाटून बनवावी. सँडविचला आत लावण्यासाठी आधी घट्ट ठेवावी आणि नंतर तिच थोडी सैलसर करून सँडविच सोबत खाण्यासाठी द्यावी.

नंतर अर्ध्या बटाट्याच्या मधल्या भागाच्या मोठ्या चकत्या कराव्यात व बाकी बटाटा कुस्करून साबूदाण्यात घालावा. मग भिजलेल्या साबुदाण्यात तिखट, मिठ, जिरे किंवा असेल तर जिरेपूड, मिरची आणि कोथिंबीर वाटून घालावी. जाडसर शेंगादाण्याचे कुट घालून ते सर्व छान एकत्र करून त्याचा मस्त गोळा बनवावा.





आता सँडविच टोस्टरला आतून तूप व्यवस्थित लावून घ्यावे. साबुदाण्याच्या गोळ्यातील एक मोठ्या लिंबाएवढा गोळा घेऊन तो आधी टोस्टरमध्ये घालावा.

तो व्यवस्थीत पसरून त्यावर हिरवी चटणी लावावी. मग चीज स्लाईस ठेवून त्यावर अननसाची एक चकती ठेवावी,डाळिंबदाणे घालून पुन्हा त्यावर साबुदाण्याच्या पिठाची एक हातावर थापून एक चकती बनवून ती त्यावर

ठेवावी व टोस्टर मंद आचेवर छान खरपूस होई पर्यत दोनही बाजूंनी मस्त ग्रील करावे.

आता हे बाहेर काढून घेऊन मध्ये तिरके कट करून सर्व्हिंग डिशमध्ये काढून चटणीसोबत सर्व्ह करावे.

वैशिष्टय:

हे सँडविच पाहूनच उपवास नसणाऱ्यांच्या पण तोंडाला पाणी सुटेल. एरव्हीसुद्धा मुलांना, मोठ्यानासुद्धा साबुदाण्याची खिचडी, थालीपीठ, वडे म्हटले तरी खाण्याचा मोह आवरत नाही. मग हे सँडविच तर लाल तिखट घातल्यामुळे जास्त खमंग तर लागतेच, पण वरून दिसायलाही खूपच आकर्षक दिसते. वरून खरपूस, खुसखुशीत, ब्राऊन कलर.. आतून चटणीचा हिरवा आणि चीजचा पिवळसर पांढरा रंग खूपच सुरेख दिसतो. हिरव्या मिरचीपेक्षा लाल तिखट आरोग्यासाठी उत्तम असते. शिवाय चीजची चव तर भारी लागतेच, सर्वांना मनापासून आवडतेसुद्धा. मिरचीच्या तिखटाला मारक असते म्हणूनही चीज घालण्याचा दुहेरी फायदा होतो. हे मुळातच टेस्टी असल्यामुळे सोबत खरेतर कशाचीच गरज नसते पण आवडत असेल तर चटणी किंवा गोड दही पण मस्त लागते. नक्की एरवी सुद्धा मधल्यावेळी खायला करून पहा.

**संघर्ष**

घरानच आसरा देण्याच नाकारलं
की दहा दिशा सादवत असतात
नेमक्या कोणत्या दिशेला जावं
तिला प्रिय असतं तिच घर
त्याच्या चार भिंती तिची नवी नाती गोती

तिला नसतंच मुळी हक्काच घर
परक्याची लेक तमक्याची बायको आणि सून
भावनेच्या भरात ती त्या चार भिंतीना आपलं मानते

पण जेव्हा त्या भिंतीही डोळे वटारून तिच्याकडे बघतात
आपली नेमकी कुठली दिशा असताव्यस्त पसरून
तिला दिशाच समजेनाशी होते

हट्टान बांधलेलं वृंदावन तीचं उरत नाही सागराला
जेव्हा ओहटी सुरू होते तेव्हा सागर व्याकूळ होत मागे परततो
ती मात्र त्या अग्निदाहात स्वतःच शीर अर्पण करते

तिची पाठवणी करतांना सोन्याची फुल जरी उधळली
तरी तिला परिटघडीचे जगणे कधीच वाट्याला येत नाही
शिकले, स्वतः सावरले तरी समाजाच्या भीतीने
ढगांच्या गर्दीत स्वतःला झोकून दिले

प्रा. डॉ. वैशाली भांडारकर
डी डी. भोयर आर्टस् & सायन्स महाविद्यालय मौदा
8380893706



**मी दोषी नव्हतो**
गझलवृत्त - कल्याण

ज्या सर्वांनी पण मजला छळले जगताना
मी दोषी नव्हतो त्यांना कळले मरताना

पापी वृत्ती त्यांची पचली नाही क्षणभर
संकट माझेही अलगद टळले फसताना

चालत होती लफडी त्यांची आडोश्याला
कागदबिगद अन सारे जळले जळताना

लुटली माझी मृत्यूपत्रे अन तीजोरी
साऱ्यांनी नशिबाला फळफळले, पळताना

हेवा होता वरवर चढत्या आलेखाचा
मोठे प्यादे त्यांचे गळले लढताना

मी गेल्याचे पडले जेव्हा त्यांच्या कानी
ते ही माझ्यासाठी हळहळले रडताना

दुश्मन कपटी प्यादे सारीपाटावरचे
अन मृत्यूनंतर अश्रू ढळले, हसताना

® रज्जाक शेख श्रीरामपूर 9665778558

**ब्रह्मतेज**

जय जय ब्रह्मतेजाय नम:
या धरेवरी तुझसी म्हणती
भू देव महा ॥धृ॥

यज्ञोपवित तू धारण करिसी
विद्याज्ञान वाहुनी नेसी
शिखासूत्र हे तुझे ऐसे
या जगी महा ॥१॥


माहुरगडाची कुलस्वामिनी
रेणुका असे तुझी मायली
परशुराम पुत्र तिचा तू
पराक्रमी महा ॥२॥

जय जय रघुवीर गर्जना करुनी
महाराष्ट्र दिशली नव संजीवनी
श्री समर्थ रामदास तू
तेजोमय रवि महा ॥३॥

पैठणक्षेत्री नाथ भक्तिने
भाग्य लाभे हे सगळा
वैकुंठीचे परब्रह्म हे
प्रगटले महा ॥४॥

तूच असशी चाणाक्ष
तूच आमुचा वीर विनायक
स्वातंत्र्यतेचे तूच असशी
स्तोत्र हे महा ॥५॥

कवी दु.दि.पळसकर पुणे





**" खेळ हा मुक्तीचा! मनुष्यजन्माचा "**

साठ वर्षांपूढे हाती काही न राहते
जीवनी मानसन्मान कुणी न देतो
असते सगळे निवृत्त जीवनाचे जगणे
कुणाचेही नसते जवळ येणे जाणे

हासणे,खेळणे, प्रेमानेहो! बोलणे
दूर्मिळ झाले आहे फारच हे जगणे!
काही न लागतो खर्च याला इथे
सत्कार्यास या! इच्छा मात्र लागते इथे

कोणी आले अथवा न आले भेटण्यास
काही न वाटू द्यावे मित्रांनो निज मनास
जे आहे जीवन! ते सदा सुखाचे मानावे
ईश्वराचे नाम घेत नित्य आनंदाने जगावे

नामस्मरणातच खरी अवीट गोडी असते
भवसागर पार करण्या भक्ता शक्ती देते
जळी,स्थळी व काष्ठी तया मोहच होतो
पैशांच्या मोहात माणूस भक्ती विसरतो

जन्म हा माणसाचा असाच जगी आहे
सदासर्वदा भार भवसागराचा तो वाहे
न कळे त्यास चालले काय जीवनी आहे!
कधी मिळेल मुक्ती त्याजलाही न ठावे!

काव्यरचना: मधुकर निलेगावकर, पुणे



**भक्तीचे वरदान**

भगवंताने दिधले तुजला,
भक्तीचे वरदान.
सदा जपावे नाम प्रभुचे,
सदा जपावे नाम .

काम सोडूनी रिकामे न बसता ,
घे सदा प्रभुचे नाम.
सदा जपावे नाम प्रभूचे,
सदा जपावे नाम.

नामामध्ये असते जादू
फसवितात अनेक भोंदू
भक्तीच्या मार्गामध्ये भगवंतास प्रणाम
सदा जपावे नाम प्रभूचे, सदा जपावे नाम

वाल्या कोळी नाम घेउनी
बनला वाल्मिकी ऋषी
ज्यांनी लिहीले रामायण
विख्यात झाले हो जगती

जपले जर का नाम तुम्ही
जादू होईल तव जीवनी
साधू संत गेले सांगुनी ,
नामाचा सेतु भव तारुनी

श्रीपाद अनंत दसरे
छ.संभाजीनगर मो.9975950801

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे–४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559